# पोलीस आयुक्त ठाणे शहर यांचे कार्यालय

खारकर आळी, कळवा ब्रिज जवळ, ठाणे, ४००६०१, दूरध्वनी क्रमांक - ०२२ - २५४४३६३६
Email - cp.thane.confibr@mahapolice.gov.in

जा.क्र. पोआ/ठाणे शहर/गोशा ५/विधीअधिकारी/ ९८५ /२०२६, दिनांक २२/०४/२०२६

विषय :- विधी अधिकारी गट-अ व ब आणि विधी अधिकारी भरती – २०२६ संबंधीची जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.

...

पोलीस आयुक्त ठाणे शहर कार्यालयाच्या आस्थापनेवर **विधी अधिकारी गट- ब आणि विधी अधिकारी** यांची रिक्त पदे भरण्यासाठी **दिनांक ११/०५/२०२६** पर्यंत अर्ज मागविण्यांत आलेले आहेत.

तरी सोबत जोडलेली जाहिरात तात्काळ ठाणे शहर पोलीस दलाचे www.thanepolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत यावी.

( श्रीकांत पाठक )
अपर पोलीस आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्त, ठाणे करीता.

प्रति
प्रभारी अधिकारी, सोशल मिडीया सेल,ठाणे शहर
२/- सोबत जोडलेली जाहिरात तात्काळ ठाणे शहर पोलीस दलाचे www.thanepolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत यावी.

प्रत :- प्रमुख लिपीक, नोंदणी शाखा
२/- विधी अधिकारी पदासाठी येणारे अर्ज दि.११/०५/२०२६ रोजी १८.०० वाजेपर्यंतच स्विकारण्यांत यावेत. तसेच अर्जासोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे (पोस्टाचे तिकीट लावलेले) जोडलेले असल्याची खात्री करुनच अर्ज स्विकारण्यात यावेत.
प्रत :- समन्वय अधिकारी ९ ए.एस.(पोलीस पत्रक प्रसिध्दीसाठी)

# -: संकेत स्थळावर दयावयाची माहिती :-

**लीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील "विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी" यांची रिक्त पदे पुर्णत: कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत.**

.......................................................................................................................................

**जाहिरात क्र. ठाआ/गोशा-1/वि.अ.भरती / 2026,१87 ठाणे शहर    दिनांक :- २२/04/2026**

ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील "विधी अधिकारी गट ब" व "विधी अधिकारी" यांची रिक्त पदे भरण्यासाठी खालील नमूद अटी व पात्रता पुर्ण करीत असलेल्या उमेदवारांकडून 11 महिन्यासाठी पुर्णत: कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. खालील दर्शविलेल्या पदामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | मानधन |
|---|---|---|---|
| 1 | विधी अधिकारी गट ब | 02 | मासिक वेतन रूपये 25,000/- + दुरध्वनी व प्रवासखर्चासाठी रूपये 3,000/- **एकूण मासिक देय रक्कम रूपये 28,000/-** |
| 2 | विधी अधिकारी | 01 | मासिक वेतन रूपये 20,000/- + दुरध्वनी व प्रवासखर्चासाठी रूपये 3,000/- **एकूण मासिक देय रक्कम रूपये 23,000/-** |

**सुचना:-**

1. अधिकारी गट ब व विधी अधिकारी या पदाकरीता करावयाचे अर्ज पोलीस आयुक्त, ठाणे, क्रिक नाका, सिडको रोड, ठाणे (प), ता. जि. ठाणे पिन नं. 4600601 यांचेकडे **दिनांक 11/05/2026 रोजी संध्याकाळी 18:00 वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.**
2. उमेदवाराने सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज परिपुर्ण भरुन व त्यासोबत आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या प्रती जोडुन लिफाफ्यात घालुन लिफाफ्याच्या उजव्या बाजूला ठळक अक्षरात **"विधी अधिकारी गट-ब किंवा विधी अधिकारी" पदासाठी अर्ज** असे नमूद करुन अर्ज **दिनांक 11/05/2026 रोजी** संध्याकाळी 18:00 वाजे पर्यन्त पोलीस आयुक्त, ठाणे शहर या पत्त्यावर पोहचेल याची दक्षता घ्यावी.
3. दिनांक 11/05/2026 रोजी 18:00 वाजलेनंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.
4. अर्जासोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावेत. (पोस्टाचे तिकीट लावलेले)
5. अर्जाचा नमुना www.thanepolice.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आलेला आहे. सदर अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन **अर्ज परिपुर्णरित्या भरावा.**
6. पोलीस आयुक्त, ठाणे शहर कार्यालयात वरील मुदतीत हस्तेदेखील अर्ज स्विकारले जातील.

**अटी व शर्ती :-**

1. विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी या पदांची नेमणूक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल.
2. उमेदवाराला शासकीय अधिकारी/कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

सदर नेमणूक हया करार नियुक्ती पध्दतीने प्रथमत: 11 महिन्यांसाठी करण्यात येतील. 11 महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी (जास्तीत जास्त 3 वेळा 11 महिन्याकरीता) वाढविता येईल. 02 वेळा मुदत दिल्यानंतरही अशा उमेदवारांची पुनश्च: नियुक्ती करणे आवश्यक आहे. असे सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च: निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

4. निवड केलेला उमेदवार 11 महिन्यांच्या कालावधीत वकीली व्यवसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसाय नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या लेखी परवानगी शिवाय करु शकणार नाही. जर खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रदद करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कार्यवाही करणेत येईल.

5. निवड केलेल्या उमेदवार यांची नियुक्ती ही पोलीस आयुक्त कार्यालया अंतर्गत असलेल्या कार्यालयामध्ये त्यांची नेमणुक करण्यात येईल.

5. **परिक्षा पध्दती (परिक्षा एकूण गुण 75) :-**

अ. उमेदवाराच्या निवडीकरीता लेखी परिक्षा 50 गुणांची व तोंडी परिक्षा 25 गुणांची असेल.

ब. नियुक्ती देणेकरीता उमेदवारांनी कमीत कमी 60 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

क. लेखी परिक्षा व तोंडी परिक्षेत प्राप्त गुण एकत्रित करून एकूण गुणानुक्रमानुसार गुणवत्ता प्राप्त ठरलेल्या उमेदवारांतून कंत्राटी पध्दतीने नेमणूकी संबधी कार्यवाही करण्यात येईल.

ड. लेखी परीक्षा घेताना जेवढी पदे भरावयाची आहेत. त्यांच्या तीनपट उमेदवार तोंडी परीक्षेस बोलविण्यात येतील.

6. **उमेदवारांची लेखी परीक्षा खालील विषयांवर घेण्यात येईल.**

★ प्रचलित नविन फौजदारी कायदे (मेजर ॲक्ट / मायनर ॲक्ट) मा. उच्च न्यायालय / मा. सर्वोच्च न्यायालय यांचे न्यायनिवाडे.

★ मा. उच्च न्यायालय, मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण समक्ष एखादया प्रकरणांत दाखल करावयाचे परिच्छेदनिहाय अभिप्राय किंवा शपथपत्र (संक्षिप्त स्वरुपात) अशा इच्छुक उमेदवारांना तयार करता येते का, याची खात्री करण्याच्या प्रश्नांचा समावेश करण्यात येईल.

★ सेवाविषयक आणि फौजदार स्वरुपाच्या प्रकरणाचा समावेश करण्यात येईल.

★ लाचलुचपत विभागाच्या सापळा प्रकरण किंवा फौ.प्र.सं. 1975 मधील कलम 197 किंवा महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अधिनियम 199 मध्ये मंजुरी मधील प्रकरणांत अभियोग दाखल करण्याची परवानगी देणे किंवा न देणे याबाबत निर्णय घेता येणे सुलभ होईल. अशा प्रकरणांची छाननी करण्याची क्षमता तपासणाऱ्या प्रश्नांचा समावेश करण्यात येईल.

★ सेवाविषयक व फौजदारी प्रकरणांतील वेगवेगळया व महत्वाच्या मुदयांवर सध्याची न्यायिक स्थिती (settled position of low) काय आहे. याबाबत प्रश्न विचारण्यात येतील.

7. लेखी परीक्षेचा व मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर पत्राद्वारे व संकेतस्थळाद्वारे व एसएमएसद्वारे कळविणेत येईल.

8. उमेदवारांना कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

9. नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement) भरणे अनिवार्य राहील.

10. करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवासखर्चा व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

11. उमेदवारांनी खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी दिनांक 30/04/2026 पर्यन्त पुर्ण करणे आवश्यक आहे.

12. अर्जासोबत 2.5 से.मी. आकाराचे सध्याचे फोटो काढलेले 4 रंगीत फोटो जोडावेत.

उमेदवारांची पात्रता, भरती प्रक्रिया इ. विषयी निर्णय घेण्याचा सर्व अधिकारी हा निवड मंडळास राहील व तो सर्व उमेदवारांवर बंधनकारक राहील.

करारातील मासिक देय रक्कम :-

1. **विधी अधिकारी गट ब** या पदाकरीता कारारातील मासिक देय रक्कम रुपये 25,000/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्चासाठी रुपये 3,000/-
2. **विधी अधिकारी** पदाकरीता मासिक देय रक्कम रूपये 20,000/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्चासाठी रु. 3,000/- देय राहील. (उपनिर्दीष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

**विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी पदाकरीता शैक्षणिक अर्हता, वय व अनुभव :-**

1. उमेदवार मान्यप्राप्त विद्यापीठाचा कायदयाचा पदवीधर असेल तो सनद धारक असेल.
2. विधी अधिकारी गट- ब व विधी अधिकारी या दोन्ही पदांसाठी वकील व्यवसायचा किमान 05 वर्षे अनुभव आवश्यक राहील.
3. उमेदवार गुन्हेगारीविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायदयाची स्थिती तथा विभागीय चौकशी इत्यादी बाबतीत ज्ञान संपन्न असेल. ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.
4. उमेदवारांस मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषेचे पुरेसे ज्ञान असेल. तसेच संगणकाचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.
5. **उमेदवाराचे वय :-**

अ. **विधी अधिकारी गट ब** या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीच्या वेळी कमाल वयोमर्यादा 60 वर्षापेक्षा जास्त नसेल.

ब. **विधी अधिकारी** या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीच्या वेळी कमाल वयोमर्यादा 60 वर्षापेक्षा जास्त नसेल.

6. जी व्यक्ती शासकीय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक, कायेदेविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायदयाचे ज्ञान असेल अशा व्यक्तींची शासकीय सेवा केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तींस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहतील. **प्रशासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.**

**विधी अधिकारी गट ब / विधी अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या:-**

1. कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/ न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
2. सेवाविषयक / प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशा तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
3. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलांकडे पाठपुरावा करणे जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.
4. शपथपत्राच्या मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे.
5. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्यानिर्णयाचा अभ्यास करुन त्याअनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात अचित कार्यवाही करणे.

उमेदवारांची पात्रता, भरती प्रक्रिया इ. विषयी निर्णय घेण्याचा सर्व अधिकारी हा निवड मंडळास राहील व तो सर्व उमेदवारांवर बंधनकारक राहील.

**करारातील मासिक देय रक्कम :-**

1. **विधी अधिकारी गट ब** या पदाकरीता कारारातील मासिक देय रक्कम रुपये 25,000/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्चासाठी रुपये 3,000/-
2. **विधी अधिकारी** पदाकरीता मासिक देय रक्कम रूपये 20,000/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्चासाठी रु. 3,000/- देय राहील. (उपनिर्दीष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

**विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी पदाकरीता शैक्षणिक अर्हता, वय व अनुभव :-**

1. उमेदवार मान्यप्राप्त विद्यापीठाचा कायदयाचा पदवीधर असेल तो सनद धारक असेल.
2. विधी अधिकारी गट- ब व विधी अधिकारी या दोन्ही पदांसाठी वकील व्यवसायचा किमान 05 वर्षे अनुभव आवश्यक राहील.
3. उमेदवार गुन्हेगारीविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायदयाची स्थिती तथा विभागीय चौकशी इत्यादी बाबतीत ज्ञान संपन्न असेल. ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.
4. उमेदवारांस मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषेचे पुरेसे ज्ञान असेल. तसेच संगणकाचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.
5. **उमेदवाराचे वय :-**

अ. **विधी अधिकारी गट ब** या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीच्या वेळी कमाल वयोमर्यादा 60 वर्षापेक्षा जास्त नसेल.

ब. **विधी अधिकारी** या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीच्या वेळी कमाल वयोमर्यादा 60 वर्षापेक्षा जास्त नसेल.

6. जी व्यक्ती शासकीय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक, कायेदेविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायदयाचे ज्ञान असेल अशा व्यक्तींची शासकीय सेवा केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहतील. **प्रशासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.**

**विधी अधिकारी गट ब / विधी अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या:-**

1. कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/ न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
2. सेवाविषयक / प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशा तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
3. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलांकडे पाठपुरावा करणे जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.
4. शपथपत्राच्या मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे.
5. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्यानिर्णयाचा अभ्यास करुन त्याअनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात अचित कार्यवाही करणे.

...ील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकिलांकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यन्त पाठपुरावा करणे.
विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

8. पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.
9. कायदा, सेवा व प्रशासकिय इतर अनुषंगीक कामे पाहणे.

**उमेदवारांस आवश्यक सुचना:-**

1. वरील सर्व नमूद अटी अर्हता व अनुभव असणारे तसेच आवयक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करणारे उमेदवार सदर पदांसाठी पात्र राहतील.
2. वरील पदांच्या भरतीतील प्रत्येक प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.
3. वरील पदांच्या भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची शिफारस किंवा गैरप्रकारचा अवलंब करण्यात येऊ नये असा प्रकार निदर्शनास आल्यास ते उमेदवार निवडीस अपात्र ठरविण्यात येतील.

वरील रिक्त पदे ही शासनाने वेळोवेळी आदेशित केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून कंत्राटी पध्दतीने भरण्याचे आदेशीत झालेले आहे. निवड प्रक्रियेबाबतची कार्यवाही करणेचे तसेच निवड झालेल्या उमेदवाराची निवड कोणत्याही कारणास्तव व कोणत्याही टप्प्यावर केव्हाही रदद करण्याचे तसेच परीक्षेसंबंधीचे नियमात बदल करण्याचा अधिकार सर्वस्वी नियुक्ती प्राधिकाऱ्यास राहील.

**( श्रीकांत पाठक, )**
अपर पोलीस आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्तालय, ठाणे

...पील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकिलांकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यन्त पाठपुरावा करणे. विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

8. पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.
9. कायदा, सेवा व प्रशासकिय इतर अनुषंगीक कामे पाहणे.

**उमेदवारांस आवश्यक सुचना:-**

1. वरील सर्व नमूद अटी अर्हता व अनुभव असणारे तसेच आवयक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करणारे उमेदवार सदर पदांसाठी पात्र राहतील.
2. वरील पदांच्या भरतीतील प्रत्येक प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.
3. वरील पदांच्या भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची शिफारस किंवा गैरप्रकारचा अवलंब करण्यात येऊ नये असा प्रकार निदर्शनास आल्यास ते उमेदवार निवडीस अपात्र ठरविण्यात येतील.

वरील रिक्त पदे ही शासनाने वेळोवेळी आदेशित केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून कंत्राटी पध्दतीने भरण्याचे आदेशीत झालेले आहे. निवड प्रक्रियेबाबतची कार्यवाही करणेचे तसेच निवड झालेल्या उमेदवाराची निवड कोणत्याही कारणास्तव व कोणत्याही टप्प्यावर केव्हाही रदद करण्याचे तसेच परीक्षेसंबंधीचे नियमात बदल करण्याचा अधिकार सर्वस्वी नियुक्ती प्राधिकाऱ्यास राहील.

**( श्रीकांत पाठक, )**
अपर पोलीस आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्तालय, ठाणे

# अर्जाचा नमुना

विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी पदाकरीता अर्ज

नियुक्तीचे इच्छुक ठिकाण :-

कार्यालयीन उपयोगासाठी-

१.अर्ज क्र. | | | | | | | |

२.अर्ज स्विकारल्याचा दिनांक-

| | |

३.अर्ज स्विकारणा-याची स्वाक्षरी दिनांकासहीत-

एका फोटोवर स्वाक्षरी करुन त्या जागी चिकटवावा. व दुसरा फोटो स्वाक्षरीकरुन अर्जा सोबत लिफाफ्यात जोडावा.

सुचना :- अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

# अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणाची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.

* आवश्यक नसेल तेथे खोडावे.

ज्या पदासाठी अर्ज केला आहे तेथे ( √ ) अशी खूण करावी.

| विधी अधिकारी गट-ब | विधी अधिकारी |
|---|---|
| | |

## अ) अर्जदाराची वैयक्तिक माहिती

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव :- आडनाव नाव वडिलांचे/पतीचेनाव

मराठीत.......................................................................

#इंग्रजीत : | | | | | | | | | | | | | | | | | | | |

२. पत्रव्यवहाराचा पत्ता :.......................................................................

तालुका :....................जिल्हा................पीनकोड | | | | | | |

३. कायमचा पत्ता :.......................................................................

तालुका :....................जिल्हा................पीनकोड | | | | | | |

४. दुरध्वनीक्रमांक-लॅन्डलाईन...............मोबाईल

क्रमांक.................... ई-मेल आयडी...........................

५.जन्म दिनांक : | | | (दिवस) | | | (महिना) | | | | | (वर्ष) जन्मस्थळ-

६. दिनांक- रोजीचे वय : | | | | (दिवस) | | | (महिना) | | | | | (वर्ष)

७. लिंग : पुरुष- ☐ महिला ☐

८. धर्म- जात-

९. महाराष्ट्राचे रहिवासी आहात का?- होय ☐ नाही ☐

योग्य असेल त्या ठिकाणी (√ ) अशी खुण करावी.

## ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती

१०. शैक्षणिक अर्हता-

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव. विद्यालय व महाविद्यालय | बोर्ड/ विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी अथवा जुनी ११ वी परीक्षा) | | | | | |
| २. उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) | | | | | |
| ३. पदवी | | | | | |
| ४. विधी पदवी | | | | | |
| ५. पदव्युत्तर परिक्षा | | | | | |

११. इतर शैक्षणिक अर्हता :
संगणक प्रशिक्षीत आहे काय?

१२. अर्जदाराची इतर माहिती
अ) सनद घेतल्याचा दिनांक
ब) उमेदवाराने स्वतः हाताळलेल्या केसेस चा तपशिल

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या. |
|---|---|---|---|
| | | | |

टिप :- वकील व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१३-अ. अर्जदारावर यापूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात/स्थानबध्द करण्यात/बध्दकरण्यात/दंड करण्यात/सिध्ददोषी ठरविण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परीक्षांना/निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापीठा कडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून/संस्थेकडून कोणत्याही परीक्षेस बसण्यात मनाई करण्यात आली आहे काय/काढून टाकण्यात आले आहे काय?

१३-ब. हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालया, विद्यापीठात किंवा कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात/संस्थेत उमेदवाराविरुध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय?

( १३-अ किंवा १३-ब चे उत्तर होय असेलतर हा अर्ज भरताना सदर खटला अटक, स्थानबध्दता, दंड दोषसिध्दी, शिक्षा देश इत्यादीचा संपूर्ण तपशिल आणि न्यायालय/विद्यापीठ/शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरुप स्पष्ट करावे.)

१३-क. सदर अर्जात भरलेला सर्व मजकूर खरा आहे व अर्जदारास मान्य आहे. सदर बाबत कोणतीही माहिती चुकीची अथवा खोटी आढळल्यास त्याबाबत उचित कार्यवाही करण्यास माझी हरकत राहणार नाही.

१३-ड.निवड प्रक्रिये बाबतची कार्यवाही करणे तसेच निवड झालेल्या उमेदवारांची निवड कोणत्याही कारणास्तव व कोणत्याही टप्प्यावर कोव्हाही रद्द करण्याचे तसेच परीक्षे संबंधीचे नियमात बदल करण्याचा अधिकार सर्वस्वी नियुक्ती प्राधिका-यास राहील. वरील सर्व अटी व शर्ती मला मान्य असून त्या अटी व शर्तीच्या आधीन राहूनच मी सदरचा अर्ज करीत आहे.

अर्जदाराची सही व पूर्ण नाव

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी श्री/सौ/कु...............................................................यांद्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/करतेकी, वरील माहिती जाणीव पूर्वक तसेच विश्वास पूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड/नियुक्ती रद्द केल्यास याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जांत नमूद केलेली माहिती खोटी अथवा चूकीची असल्यास त्याची पूर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील. व त्याबाबतीत माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन.तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :-

दिनांक :-

( अर्जदाराची सही )
( दिनांकासह )

सोबत :- अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकीत प्रती जोडाव्यात.

सत्यमेव जयते

# पोलीस आयुक्त ठाणे शहर यांचे कार्यालय

खारकर आळी, कळवा ब्रिज जवळ, ठाणे, 400601, दूरध्वनी क्रमांक - 022 - 25443636
Email - cp.thane.confibr@mahapolice.gov.in

**पोलीस आयुक्त ठाणे शहर आस्थापनेवरील विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी यांची रिक्त पदे पूर्णत: कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत.**

## -: जाहिरात :-

जा.क्र.ठाआ/गोशा-1/वि.अधि.-भरती/१४३ /2026, दिनांक - २२एप्रिल 2026.

पोलीस आयुक्त ठाणे शहर कार्यालयाच्या आस्थापनेवर विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी यांची रिक्त पदे भरावयाची आहेत.

खालील नमुद विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याकरीता नमूद अटी व पात्रता पूर्ण करीत असलेल्या उमेदवारांकडून 11 महिन्याकरीता पूर्णत: कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. खालील दर्शविलेल्या पदामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | मानधन |
|---|---|---|---|
| 1 | विधी अधिकारी गट ब | 02 | मासिक वेतन रूपये 25,000/- + दुरध्वनी व प्रवासखर्चासाठी रूपये 3,000/- **एकूण मासिक देय रक्कम रूपये 28,000/-** |
| 2 | विधी अधिकारी | 01 | मासिक वेतन रूपये 20,000/- + दुरध्वनी व प्रवासखर्चासाठी रूपये 3,000/- **एकूण मासिक देय रक्कम रूपये 23,000/-** |

अर्ज करण्याबाबतची सविस्तर माहिती www.thanepolice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण :- ठाणे

दिनांक :-22/04/2026.

**( श्रीकांत पाठक )**
अपर पोलीस आयुक्त, प्रशासन,
पोलीस आयुक्त ठाणे शहर करीता